SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ०७१ ● पुणे ● शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


ओढ्यात सोडलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ 3


डॉ. सायरस एस. पूनावाला यांना पुरस्कार प्रदान 4

## ठळक बातम्या

### अपघातातील जखमी मुलीचा मृत्यू

पिंपरी : (आरंभ पर्व): चाकण-शिक्रापूर मार्गावर १६ जानेवारी रोजी भरधाव कंटेनरच्या धडकेत जखमी झालेल्या मुलीचा गुरुवारी पिंपरीत उपचारादरम्यान मृत्यू झाला. धनश्री अंबादास गाढवे ( वय ७, रासे, खेड) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. चाकण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धनश्री आईबरोबर १६ जानेवारी रोजी दुचाकीवरून चालली होती. त्या वेळी भरधाव वेगात आलेल्या कंटेनरने दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्या तिघीही जखमी झाल्या. धनश्री हिच्यावर पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात उपचार सुरू होते. गुरुवारी उपचारादरम्यान धनश्री हिचा मृत्यू झाला. पोलिसांच्या मोटारीसह दहा वाहनांना धडक देणारा कंटेनर चालक अकिब अब्दुल रज्जाक खान (वय २५, रा. पलवल, हरियाणा) याच्यावर सरकारी कामात अडथळा आणणे आणि अपघात करणे असे दोन गुन्हे चाकण पोलीस ठाण्यात दाखल आहेत. शिक्रापूर पोलीस ठाण्यातही अपघाताचा गुन्हा दाखल आहे. एका डंपरला धडक दिल्यानंतर कंटेनर बंद पडला. नागरिकांनी अकिबला बेदम मारहाण केली. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या अकिबवर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरू होते. रुग्णालयातून सोडल्यानंतर चाकण पोलिसांनी त्याला अटक केली.

### नवी मुंबईतील धर्तीवर पुण्यातही ‘सायबर लॅब’

पुणे (आरंभ पर्व) : शहरात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. सायबर चोरट्यांना पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. सायबर गुन्ह्यांचा तपासासाठी नवी मुंबईतील धर्तीवर पुण्यात सायबर लॅब सुरू करण्याचा विचार आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत असून, गृहविभागाकडे याबाबतचा प्रस्ताव लवकरच पाठविण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. पुणे शहरातील वार्षिक गुन्ह्यांचा आढावा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी घेतला. या वेळी त्यांनी शहरातील वाढते सायबर गुन्हे आणि पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. सायबर गुन्हे रोखण्यासाठी देशपातळीवरील तपास यंत्रणा प्रयत्न करत आहेत. सायबर गुन्ह्यांबाबत पोलिसांकडून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. चोरट्यांचा आमिषांना बळी पडू नका, असे आवाहन करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

### गंभीर गुन्ह्यात घट

पुणे (आरंभ पर्व) : शहरात वर्ष २०२३ च्या तुलनेत मागील २०२४ या वर्षात खून, खुनाचा प्रयत्न, घरफोडी अशा गंभीर गुन्ह्यांत घट झाली आहे. मात्र, मागील पाच वर्षांपासून आर्थिक व सायबर फसवणूक, ‘स्ट्रीट क्राइम’, महिलांवरील लैंगिक अत्याचार, विनयभंगाच्या गुन्ह्यांचा आलेख वाढत चालल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. दरम्यान, मागील वर्षभरात पोलिसांना गंभीर गुन्ह्यांचा छडा लावण्यात यश आले आहे. सायबर फसवणूक, ‘स्ट्रीट क्राइम’ रोखण्यासह वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

# पुण्यात ‘व्हीव्हीआयपीं’चा राबता

## पंतप्रधान, राष्ट्रपतींसह अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे ८५३ दौरे; पोलीस प्रशासनावर ताण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील नावलौकिक सर्वदूर पसरला आहे. देश आणि राज्य पातळीवर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा राबता पुण्यात वाढला आहे. २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन वेळा पुणे भेटीवर आले होते, तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही पुण्यास एकदा भेट दिली होती. गेल्या वर्षी पुणे शहरात अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे ८५३ दौरे झाले. २०२३ च्या तुलनेत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यात दुपटीने वाढ झाली आहे.



पुणे शहराचा विस्तार वाढत आहे. देश पातळीवर अनेक महत्त्वाच्या संशोधन, लष्करी संस्था, उद्योग पुण्यात आहेत. राजकीय घडमोडी, तसेच विविध राजकीय कार्यक्रमांस राजकीय नेत्यांकडून उपस्थिती लावली जाते. गेल्या वर्षी पुण्याच्या नावलौकिकात भर घालणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील जी २० परिषद पार पडली. या परिषदेस जगभरातील उच्चपदस्थ अधिकारी, उद्योजकांनी उपस्थिती लावली. परिषदेच्या निमित्ताने पुण्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरात येणाऱ्या उच्चपदस्थ, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या बंदोबस्ताची जबाबदारी पुणे पोलिसांच्या विशेष शाखेकडे असते. विशेष शाखेकडून बंदोबस्ताची आखणी, तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला जातो. पुणे शहरात गेल्या वर्षी अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे ८५३ दौरे झाले, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन वेळा पुणे दौऱ्यावर आले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही पुण्यास भेट दिली होती. २०२३ मध्येही पंतप्रधान आणि राष्ट्रपती पुणे भेटीवर आले होते.

## पोलीस असल्याच्या बतावणीने महिलेचे सहा लाखांचे दागिने चोरले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पोलीस असल्याच्या बतावणीने महिलेचे सहा लाख रुपयांचे दागिने चोरुन नेल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात घडली. याबाबत एका महिलेने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला वडगाव बुद्रुक परिसरातील एका मंगल कार्यालयात आल्या होत्या.

विवाह समारंभ आटोपून त्या दुपारी तीनच्या सुमारास मंगल कार्यालयातून बाहेर पडल्या. त्या वेळी दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्याने खाकी रंगाची पँट परिधान केली होती. त्यांनी महिलेकडे पोलीस असल्याची बतावणी केली. या भागात महिलांकडील दागिने चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.



दागिने काढून पिशवीत ठेवा, अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. त्यानंतर महिलेने पिशवीत दागिने ठेवली. पिशवीत दागिने ठेवले का नाही, याची तपासणी करण्याचा बहाणा करुन चोरट्यांनी महिलेच्या नकळत दागिने काढून घेतले. महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरटे दुचाकीवरुन पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक किरण लिटे तपास करत आहेत.

# सावित्रीबाई फुले विद्यापीठातील उच्चशिक्षित तृतीयपंथीय विद्यार्थी सारंग पुणेकरची आत्महत्या


## जयपूरमध्ये संपवलं आयुष्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात शिक्षण घेणारी पहिली उच्चशिक्षित ट्रान्सजेंडर सारंग पुणेकरने राजस्थानच्या जयपूरमध्ये आपलं आयुष्य संपवलं आहे. सारंग पुणेकर उच्चशिक्षित होत्या. सावित्रीबाई फुले विद्यापीठातील पहिल्या ट्रान्सजेंडर विद्यार्थी होत्या. गुरुवारी पुण्यात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांनी ट्रान्सजेंडर्ससाठीच्या अनेक चळवळींमध्ये भाग घेतला होता. लॉकडाऊनच्या काळात सारंग पुणेकर यांनी पुण्यातील वंचितांसाठी महत्त्वाचं कार्य केलं होतं. ट्रान्सजेंडर समुदायातून उच्च शिक्षण घेतलेल्या त्या पहिल्या विद्यार्थी होत्या.

राजस्थानच्या जयपूरमध्ये सारंग पुणेकर ट्रान्सजेंडर समुदायासह राहात होत्या. तसंच तिथल्या तृतीयपंथीय समाजासाठी त्या कार्यरतही होत्या. आम्ही सारंगला पुण्यात परत येण्याबद्दल विचारणा केली होती. असं अश्विनी सातव यांनी सांगितलं.

सारंग पुणेकर या आंबेडकर चळवळीच्या समर्थक होत्या. NRC आणि



CAA विरोधात त्यांनी आवाज उठवला होता. जात आणि शक्ती पदानुक्रमाच्या विश्लेषणात त्या प्रचंड हुशार होत्या. विद्यापीठातील पहिली ट्रान्सजेंडर विद्यार्थी म्हणून, तिची उपस्थिती आमच्यासाठी, शैक्षणिक तसेच प्रशासक म्हणून एक अनोखा अनुभव होता,” असं एसपीपीयूमधील महिला अभ्यास विभागाच्या प्रमुख डॉ. अनघा तांबे यांनी म्हटलं आहे.

सारंग पुणेकर यांना अखेरचा निरोप देण्यासाठी जमलेल्या लोकांमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांचाही समावेश होता. सारंग पुणेकर यांनी अल्पावधीतच एक उत्साही वक्त्या आणि लिंग हक्क आणि इतर कारणांसाठी समर्थक म्हणून स्वतःचे नाव कमावले होते. “विद्यार्थी असताना, पुणेकरांनी लिंगभेद अभ्यासाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन समाजापुढे ठेवला. सारंगला आणखी ज्ञान आत्मसात करायचे होते आणि सारंगला समुदायाच्या भाषा आणि चालीरीतींबद्दल मौलिक काम करायचे होते. समाज म्हणून आपण सारंगच्या स्वप्नांना पाठिंबा देऊ शकलो नाही हे आपले अपयश आहे,” अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

सारंग पुणेकर यांनी पुण्यातील वंचित महिला आणि लिंगभेदावर काम करणाऱ्या एनजीओ सम्यकमध्ये उत्तर महाराष्ट्रात प्रादेशिक समन्वयक म्हणून काम केले होते. एनजीओचे कार्यकारी संचालक आनंद पवार म्हणाले की, त्यांना सुरुवातीला सम्यक म्हणून संबोधण्यात आले होते परंतु नंतर त्यांना सामावून घेण्यात आले. “विकास क्षेत्रात एचआयव्ही प्रतिबंधक कार्यक्रमांमध्ये ट्रान्सजेंडर लोकांना काम देणे नेहमीच सामान्य आहे. परंतु तिने स्टिरियोटाइप तोडला आणि गर्भपाताच्या अधिकारांसाठी काम केले. समन्वयक म्हणून तिने हा प्रकल्प यशस्वीरित्या राबवला,” असे ते म्हणाले.

सारंग पुणेकर यांना काम करत असताना सरकारी अधिकारी, डॉक्टर आणि एनजीओंशी समन्वय साधावा लागला. हा प्रकल्प २०२० मध्ये पूर्ण झाला आणि सारंग पुणेकरने राजस्थानला स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतला. “सारंगने सांगितले की तिला तिथल्या समुदायासोबत राहायचे आहे,” पवार म्हणाले. याच सारंग पुणेकर यांनी आत्महत्या करुन त्यांचं आयुष्य संपवलं आहे. १७ जानेवारीला ही घटना समोर आली. सारंग पुणेकर यांच्या पार्थिवार गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR

आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com



Call Now ७२७६३१४१४२

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व

पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर, जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर

पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा

इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com

वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक

(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272



# कुंभमेळ्यात मुस्लिमांची दादागिरी

प्रत्येक भारतीयाच्या मनात एक पुण्यकर्म, धर्मकार्य आणि अन्य संस्कारांच्या संदर्भात एक आस्था असते. या आस्थेच प्रकट रूप आपल्याला कुंभांच्या रूपाने संगमांवर पाहायला मिळते. भारतीय संस्कृती, सनातन धरोहर आणि अर्थव्यवस्था या सगळ्यांना एका सूत्रात आणणारी एक सनातन, पुरातन व्यवस्था म्हणजे कुंभमेळा. भगवान विष्णूच्या कूर्मावतारापासून महाकुंभाचे आयोजन होते, असे अनेक कथांमधून सांगितले जाते. अमृतकुंभ मिळवण्यासाठी जे युद्ध झाले त्यात हे अमृत प्रयागराज, उज्जैन, नाशिक आणि हरिद्वार येथे सांडले. तेव्हापासून या चार ठिकाणी कुंभमेळ्याचे आयोजन सुरु झाले असे म्हणतात. यावरूनच हजारो वर्षांपासून चालत आलेला हा मेळा आहे, हे सहजच समजून येते. या वर्षी बारा वर्षांनी १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी म्हणजे संक्रांत ते महाशिवरात्रीपर्यंत उत्तरप्रदेशातील प्रयाग येथे महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कुंभात गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या या त्रिवेणी संगमावर डुबकी मारण्यासाठी जवळपास ४०-४५ करोड लोक इथे येतील असे अनुमान लावण्यात येत आहे.

गंभीर बाब अशी कि, कुंभमेळा ज्या ठिकाणी भरणार आहे, ती जागा वक्फ बोर्डाची आहे असा दावा All India Muslim Jamat च्या अध्यक्षानी केला आहे. अखिल भारतीय मुस्लिम जमातचे अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी बरेलवी यांनी दावा केला आहे की, ५५ बिघा वक्फ जमीन हिंदू धार्मिक कार्यक्रमासाठी वापरली जात आहे. आपल्या विडिओ मध्ये ते म्हणतात कि, "बघा आम्ही मुस्लिम समाज इतकं मोठं मन दाखवून तुम्हाला आमच्या वक्फच्या जमिनीवर कुंभमेळा साजरा करू देत आहोत. पण तुम्ही मुस्लिम समाजाने तिथे आपली दुकाने लावू नयेत असे हुकूम काढत आहात.'

मुस्लिम नेत्यांच्या या दुटप्पी भूमिकेचा सर्व बाजूनी विरोध होतो आहे. दोन चारशे वर्षांपूर्वीचे काहीतरी खोटे पुरावे दाखवून एकतर या जमिनी वक्फच्या आहेत असे दावे हे लोक करतात.

दुसरे म्हणजे, हजारो वर्षे चालू असणाऱ्या हिंदू कार्यक्रमांचे उच्चाटन करू पाहतात.

तिसरे म्हणजे हा मेळा कोणीही थांबवू शकत नाही, हे लक्षात आल्यावर तिथे आर्थिक फायदा मिळवण्यासाठी खोटेनाटे कांगावे करून घुसखोरी करू पाहतात.

चौथे म्हणजे हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये अन्न वस्त्र निवार्याचे पावित्र्य, अहिंसा, स्वच्छता इत्यादी गोष्टी अत्यंत महत्वाच्या असतात. मुस्लिम लोक तर अनेकदा हिंदूंना डिवचण्यासाठी म्हणून हिंदूंना आत्यंतिक प्रिय आणि पवित्र असणारी गोमाताही मारून खातात, याची उदाहरणे आहेत. आर्थिकदृष्ट्या गोमांस स्वस्त असते वगैरे दुय्यम बाबी आहेत.

अजून एक मुद्दा म्हणजे हल्ली थूक जिहादची संकल्पना मुस्लिम समाजाकडून खूपच मोठ्या प्रमाणात वापरली जाते आहे. काही मुस्लिम दुकानदार त्यांच्या वस्तूंवर खाद्यपदार्थांवर थुंकून त्या वस्तूंची विक्री करतात, असे कित्येक व्हिडिओज अनेक वेळा समाजासमोर येत असतात.

जगभरात जे काही आतंकी हमले केले जातात, विमाने हायजॅक केली जातात, युद्धे केली जातात, त्यात मुस्लिम अतिरेक्यांचा, जिहादी गटांचा मोठा हात असतो. त्यांना विरोध करायचे तर दूरच, पण बहुतांश मुस्लिम समाजाकडून त्यांचा मोठ्या प्रमाणावर आदर केला जातो, मृतांना शाहिद घोषित करून लाखोंच्या संख्येने त्यांच्या अंत्ययात्रा काढल्या जातात.

अनेक मदरश्यांमधून आतंकी कारवाया करण्याचे शिक्षण दिले जात असल्याचे उघडकीस येऊ लागले आहे.

हल्ली एक नवाच जिहाद -'ट्रेन जिहाद' खूपच येऊ पहात आहे. रेल्वे रुळांवर सिलेंडर वगैरे ठेवून, ट्रेन चे रूळ उखडून टाकून ट्रेन अपघात घडवू आणायचा असे शिक्षण दिले जात असल्याचे प्रकारही उघडकीस येऊ लागले आहेत. महाकुंभाच्या पार्श्वभूमीवर भारतभरात १३००० नव्या रेल्वे गाड्या सोडण्यात येणार आहेत.

मुस्लिमांना कोणत्याही प्रकारे हिंदूंच्या धार्मिक भावना, त्यामागची संकल्पना याविषयी कोणतेही ममत्व, कुतूहल, अध्यात्मिक उन्नतीची अपेक्षा असले काहीही नाही. त्यांच्या धार्मिक संकल्पना पूर्णपणे वेगळ्या आहेत. मात्र त्यांना हिंदूंच्या 144 वर्षांनी येवू घातलेल्या कार्यक्रमात फक्त हिंदू ग्राहकांचा पैसा उकळण्यासाठी प्रवेश हवा आहे हे उघड आहे.

आजवर कोणत्या इदी उरुसाच्या कार्यक्रमात, मुस्लीम कार्यामध्ये हिंदूंना काम दिले गेले आहे? किंवा त्यांना प्रवेश तरी करू दिला गेला आहे?? मोठे कार्यक्रम सोडा, मशिदीमध्ये तरी हिंदू माणूस, हिंदू म्हणून अभिमानाने आणि न घाबरता प्रवेश करू शकेल?? हिंदू पोलिस किंवा सरकारी अधिकारी सुध्दा मशिदीमध्ये आणि मुस्लीम अधिक लोकसंख्या असणाऱ्या गल्ली मोहोल्यांमध्ये जावू शकत नाहीत. अशी आजची परिस्थिती आहे.

सेक्युलर देश असेल तर तो सर्वांसाठी समान कायद्याचा अवलंब करणारा हवा ना? मग महकुंभात जे मुस्लीम प्रवेश मागत आहेत त्यापैकी किती जणांनी हिंदूंना मशिदिसमोर दुकाने लावू द्यावीत म्हणून मोर्चे, आंदोलने, केली आहेत? बाकी मोठ्या बाता सोडा, निदान सोशल मीडियावर तरी यावर एखादी तरी पोस्ट लिहिली आहे काय?? मग अश्या वेळी हिंदूंना त्यांचे धार्मिक कार्यक्रम निर्धास्तपणे करण्याची व्यवस्था लावून देणे, gullible भोळ्या भाबड्या हिंदू भाविकांना सुरक्षितता प्रदान करणे हे अत्यंत जोखमीचे काम राज्य आणि केंद्र सरकारला करावे लागणार आहे.

आणि त्यासाठी आवश्यक ती पावले सरकार उचलत असेल तर ती योग्यच बाब आहे. त्याबद्दल सरकारचे अभिनंदनच करावयास हवे. त्याचप्रमाणे ५५ बिघा जमिनीचा दाव्याचीही खोलवर चौकशी करून तो विषय सरकारने तत्काळ मोडीत काढावा अशी मागणी हिंदू संघटनांकडून होते आहे.

# सुनील नलावडे यांच्यासह सहा कर्मचाऱ्यांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महामंडळा स्वारगेट आगारातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा दत्त मंदिर स्वारगेट डेपो या ठिकाणी आयोजित करण्यात आला. कामगार नेते सुनील भाऊजी नलावडे व इतर सहा कर्मचाऱ्यांचा यानिमित्त सत्कार करण्यात आला. कामगार नेते सुनील नलावडे यांची संपूर्ण 35 वर्षे सेवा पूर्ण केला असून अतिशय चांगल्या पद्धतीची सेवा त्यांनी आपल्या कार्यकाळात पार पाडली आहे. ज्या त्या पदावर ते काम करत असतात त्या पदाला त्यांनी संपूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न केला व महत्त्वाचे म्हणजे संघटनेच्या माध्यमातून कामगाराचे जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले आहेत .कामगाराच्या अडीअडचणीसाठी अहोरात्र त्यांनी काम केलेले आहे शांत स्वभाव व कोणत्याही कामाचे जबाबदारी ती घेत असतात यापुढेही त्यांनी संघटनेच्या माध्यमातून कामगारांना वेळ देऊन कामगाराचे अजूनही बरेच प्रश्न मार्गी लागायचे बाकी आहेत यासाठी त्यांनी पुढे काम करावं अशी इच्छा सर्व कामगारांच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी स्वारगेट आगारातील इतरही सहा निवृत्त सेवकांचा सन्मान करण्यात आला. श्री. चंद्रकांत ढोले, श्री, राकेश मंडल ,श्री.चंद्रकांत देशमाने, श्री. किशोर गायकवाड, श्री. दत्तात्रय शिंदे ,श्री. बाळासाहेब गाडेकर या सर्व सेवकांनी आपली सेवा अतिशय तत्परतेने बजावून पुणेकरांना सेवा दिलेली आहे. खरंतर पीएमपीएल ची सेवा ही जबाबदारीची आहे जनतेला प्रवाशांना सुखरूप व वेळेत तत्परसेवा द्यावी लागते.यात कामगाराचे मोठे योगदान असतं आपलं सर्व काही विसरून ते नऊ तास प्रवाशांची काळजी घेत असतात.त्यामुळे सर्व सेवकांचा सन्मान अत्यंत उत्साहात झाला. या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिलेले माजी नगरसेवक आनंद भाऊ रिठे, राष्ट्रवादी क्रीडा सेल अध्यक्ष माअण्णा देशमुख, स्वीकृत नगरसेवक शशिकांत काळे , अभियंता मा. राजापुरे ,माजी पीएमटी सदस्य मा. हाजी शाबीर खान ,राष्ट्रवादी कामगार युनियन उपाध्यक्ष हरीश ओव्हाळ, पीएमसी बँक विद्यमान संचालक मा .शेखर सावंत, प्रवीण कुमार नेटके पीएमसी बँक माजी अध्यक्ष सुनील कांबळे ,पीएमटी इंटक उपाध्यक्ष सागर कांबळे, स्वारगेट डेपो युनियन अध्यक्ष विवेक कदम, ज्ञानेश्वर जावळकर, भाऊसाहेब दळवी, सुनील रोकडे, तानाजी कांबळे ,सोपान जांभळे ,नंदू पाटील , अप्पा कदम विशाल कदम तसेच सेवानिवृत्त सेवक स्वारगेट डेपोतील चालक वाहक महिला सेवक आणि सर्व पदाधिकारी वरिष्ठ कर्मचारी व मार्गदर्शक उपस्थित होते.




## थोडक्यात



### महाराष्ट्र विधीमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रतोदपदी आ. शेखर निकम

**चिपळूण (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधानसभा प्रतोदपदी चिपळूण- संगमेश्वर विधानसभा मतदार संघाचे आमदार शेखर निकम यांची नियुक्ती झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आमदार शेखर निकम यांची विधानसभेच्या प्रतोद पदावर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. आ. निकम यांच्या प्रतोदपदी केलेल्या नियुक्तीला मान्यता द्यावी, असे पत्र विधानसभा अध्यक्षांना राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी दिले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव यांनाही याबाबतचा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. आमदार शेखर निकम यांची राष्ट्रवादीच्या प्रतोदपदी नियुक्ती झाल्याने चिपळूण- संगमेश्वरमधील कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. चिपळूण- संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी या मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढवताना दुसऱ्यांदा विजयाची मोहोर गेल्या काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत उमटवली आहे. तर पहिल्याच टर्ममध्ये विधी मंडळात चिपळूण- संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न उपस्थित करून ते प्रश्न मार्गी लावले आहेत. तर या मतदारसंघात सुमारे अडीच हजार कोटींचा निधी आणून विकासाला मोठी चालना दिली आहे. तर गेल्या काही महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकीत दुसऱ्यांदा विजयाची मोहोर उमटवली. एकंदरीत आमदार निकम यांनी विधिमंडळात केलेले अभ्यासपूर्ण भाषणे, मांडलेले विकासात्मक मुद्दे यावरून निकम यांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. याचीच दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आमदार शेखर निकम यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रतोद विधानसभा या पदावर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. तसे पत्र विधानसभा अध्यक्ष यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देऊन मान्यता द्यावी, असे नमूद केले आहे. या निवडीबद्दल चिपळूण- संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातून आमदार शेखर निकम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**



# फुटबॉल : स्पोर्ट्स मॅनियाला एका गुणावर समाधान

- **राजस्थान युनायटेडविरुद्ध गोलशून्य बरोबरी**
- **'होम लेग' मधील विजयी कामगिरीला ब्रेक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एआयएफएफ एलिट युथ फुटबॉल लीगमधील 'होम' सामन्यात यजमान स्पोर्ट्स मॅनियाला राजस्थान युनायटेड एफसीविरुद्ध एका गुणावर समाधान मानावे लागले. या गोलशून्य बरोबरीमुळे स्पोर्ट्स मॅनियाच्या घरच्या मैदानावरील विजयी कामगिरीला ब्रेक लागला. स्पोर्ट्स एरिना टर्फ, वाकड येथे झालेल्या एच गटातील लढतीत बुधवारी ड्रॉचा फायदा यजमान स्पोर्ट्स मॅनियाला झाला. गटात दुसरे स्थान कायम राखून त्यांनी पुढील फेरीसाठी पात्र ठरण्याची दावेदारी कायम ठेवली आहे. एच गटातील सामना हा स्पोर्ट्स मॅनिया (15 गुण) आणि राजस्थान युनायटेड (10 गुण) या दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थनावरील संघांदरम्यान झाला. राजस्थान युनायटेड संघ जिंकला असता तर हे अंतर दोन गुणांपर्यंत कमी होण्यास मदत झाली असती आणि फक्त तीन राऊंड खेळून अव्वल दोन संघांमध्ये स्थान मिळवण्याची शक्यता वाढली असती.

# धायरी भागाच्या विकासासाठी निवडणूक व्हायला हवीच!

## भाजपा खडकवासला सरचिटणीस बाप्पूसाहेब पोकळे






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या अनेक वर्षापासून अधिक काळ महानगरपालिका निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या नाहीत. परंतु या निवडणुका पाहिजे कारण की स्थानिक लोकांचे खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न आहेत ते प्रश्न आता प्रशासन असताना लवकरात लवकर सुटले जात नाही. समस्या जैसे तेच राहतात.जास्तीत जास्त फॉलोअप घेतला तरीही प्रशान जेवढे पाहिजेल तेवढे काम करत नाही .त्यामुळे लोकांच्या समस्या आहे तसेच राहतात. नवीन समाविष्ट गावांमध्ये प्रशासन यंत्रणा कमी पडत आहे. प्रत्येक विभागाला पाहिजे तेवढे मनुष्यबळ पाहिजेल तेवढे नाही. त्यामुळे अनेक कामही पेंडिंग राहिले जातात. लवकर काम होत नाही समाविष्ट गावांसाठी डीपी फायनल नाही डीपीआर फायनल नाही तरी लवकरात लवकर महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्यानंतर त्या त्या प्रभागाला प्रतिनिधी आल्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात कामे होतील. प्रभागातीळ परिसरातील कामे ही अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देण्यास लोक प्रतिनिधीद्वारे मदत होईल तर ही कामे लवकरात लवकर मार्गी लागतील.

धायरी व परिसरात ड्रेनेज लाईनची कामे व्हायला हवी. अनेक भागामध्ये मुबलक पाणी नाही. अनेक भागांमध्ये पाईपलाईनची कामे विकसित झाली नाही. शिवाय अनेक भागातील पावसाळी लाईनही उपलब्ध नाहीत.

अनेक भागामध्ये रोड, पाण्याचा खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न आहे. धायरी व परिसरातील लहान मुलांसाठी ज्येष्ठांसाठी नाना नानी पार्क, गार्डन, प्लेग्राउंड एरिया, बस स्थानक, पोलीस चौकी, ह्या सुविधा मिळवण्यासाठी पुणे महानगरपालिकेची निवडणूक होणे गरजेचे आहे. या भागातील गाजणाऱ्या ट्रॅफिक समस्या सुटल्या पाहिजे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव तापकीर यांच्या निधीतून ही धायरी परिसरामध्ये विकास कामे झाले आहेत.

मात्र महानगरपालिकेच्या अंतर्गत निधीतूनही विकास कामे झाल्यास प्रभागाचा विकास होण्यास नक्कीच मदत होईल.




### गौणखनिज उत्खननावरून विकसकांना १२ कोटींचा दंड

**राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : शासकीय गायरान आणि खासगी जागेत अवैध उत्खनन केल्याप्रकरणी खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांनी विकसकांना १२ कोटी ६ लाख ४० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. सिद्धेगव्हाण (ता. खेड) येथील २३२/१ आणि २३२/२ या गटांत हे उत्खनन झाले आहे. खेडच्या तहसीलदार देवरे यांनी नुकताच हा आदेश दिला आहे. जमीन विकसक ज्ञानेश्वर केरबा पठारे आणि अनिल धोत्रे (रा. चंदननगर हडपसर, पुणे) यांना हा दंड केला आहे. अवैध जमीन उत्खननात एवढ्या मोठ्या रकमेचा दंड ठोठावला जाण्याची ही पहिलीच वेळ असल्याची चर्चा तालुक्यात आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी यांनी याप्रकरणी पाठपुरावा केला. सुमारे वर्षभरापुर्वी फेब्रुवारी २०२४ मध्ये हे उत्खनन झाले आहे. या प्रकरणात सिद्धेगव्हाणचे तत्कालीन सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी तत्कालीन तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे तक्रार केली होती. मंडळ अधिकारी माणिकराव गायकवाड व गाव कामगार तलाठी सतीश शेळके यांनी पंचनामा केला होता. त्यानुसार १ लाख ६८ हजार ब्रास मुरूम मातीचे उत्खनन केल्याचा अहवाल तहसीलदारांना देण्यात आला होता. संबंधितांनी हे उत्खनन करून जवळपास १ हेक्टर ५२ आर जमीन तयार केली. त्यात चढ-उतार असलेली शासकीय गायरान व खासगी क्षेत्र असलेल्या जमिनीचा समावेश आहे. याशिवाय नकाशावर अधोरेखित असलेला सिद्धेगव्हाण ते वाजेवाडी रस्ता विकसकांनी उखडून टाकला असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी तहसीलदार ज्योती देवरे यांच्याकडे सुरू होती. ११ जानेवारी रोजी याबाबतचा निकाल देण्यात आला असून अनिल धोत्रे आणि ज्ञानेश्वर पठारे यांच्यावर ही दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.**

# 'ॲक्सिस निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स फंड' लाँच

- **निफ्टी500 मोमेंटम 50 टीआरआयचा मागोवा घेणारा ओपन-एंडेड इंडेक्स फंड**



| Scheme Name and Benchmark | Product Labelling | Scheme Risk-o-meter | Benchmark Risk-o-meter |
|---|---|---|---|
| Axis Nifty500 Momentum 50 Index Fund (An Open-Ended Index Fund tracking Nifty500 Momentum 50 TRI)<br>Benchmark: Nifty500 Momentum 50 Index | This product is suitable for investors who are seeking*<br>• Long term wealth creation solution.<br>• An Index fund that seeks to track returns by investing in a basket of Nifty500 Momentum 50 stocks and aims to achieve returns of the stated total return index, subject to tracking error.<br>*Investors should consult their financial advisers if in doubt about whether the product is suitable for them. | The risk of the scheme is Very High | The risk of the benchmark is Very High<br>Nifty500 Momentum 50 Index |

The above product labelling assigned during the New Fund Offer is based on internal assessment of the Scheme Characteristics or model portfolio and the same may vary post NFO when actual investments are made)

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या फंडांपैकी एक, ॲक्सिस म्युच्युअल फंडाने ॲक्सिस निफ्टी500 मोमेंटम 50 इंडेक्स फंड - हा निफ्टी500 मोमेंटम 50 TRI चा मागोवा घेणारा ओपन-एंडेड इंडेक्स फंड सादर केला आहे. नवीन फंड ऑफरचा (NFO) कालावधी 24 जानेवारी ते 7 फेब्रुवारी 2025 पर्यंत असेल आणि निधी NIFTY500 मोमेंटम 50 TRI च्या विरूद्ध बेंचमार्क केला जाईल.

भारतीय गुंतवणूकदारांचे भारतातील गुंतवणुकीच्या पर्यायांमधील निष्क्रिय धोरणांमधील वाढते स्वारस्य ही नवीन ऑफर दर्शवते. गुंतवणूकदार अधिक सोप्या आणि किफायतशीर सोल्यूशनसह प्रगती असलेल्या स्टॉक्सचे भांडवल करण्याचा विचार करतात. ट्रॅकिंग एरर अंतर्गत निफ्टी500 मोमेंटम 50 TRI शी संबंधित खर्चापूर्वी परतावा प्रदान करणे हे योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट आहे. असे असले तरी, योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्य होईल, याची खात्री नाही.

सध्याच्या किमतीच्या ट्रेंडचे सातत्यपूर्ण भांडवल करणारी मोमेंटम गुंतवणूक ही जागतिक बाजारपेठांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या एक शक्तिशाली धोरण असल्याचे सिद्ध झाले आहे आणि भारतही त्याला अपवाद नाही. मजबूत वेगाने वाढणाऱ्या समभागांची कामगिरी मोजण्यासाठी निफ्टी500 मोमेंटम 50 निर्देशांक डिझाइन केले आहे. गेल्या 6 महिन्यांतील स्टॉक आणि अस्थिरतेसाठी समायोजित केलेल्या 12 महिन्यांच्या परताव्याच्या आधारे गतीचे मोजमाप केले जाते. उच्च-कार्यक्षम समभागांवर लक्ष केंद्रित करून, हा इंडेक्स फंड गुंतवणूकदारांना अलिकडच्या इतिहासात चांगली कामगिरी करणाऱ्या समभागांमध्ये गुंतवणुकीची संधी देतो, पर्यायाने भविष्यातील परतावा वाढवतो. Axis Nifty500 Momentum 50 Index Fund चे उद्दिष्ट गुंतवणूकदारांना उच्च गतीचे प्रदर्शन करणाऱ्या शीर्ष 50 समभागांना प्रोत्साहन देऊन या संधीचा लाभ घेण्याचे आहे. निफ्टी500 मोमेंटम 50 इंडेक्सचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते मोठ्या, मिड आणि स्मॉल कॅपमधील स्टॉक्सची निवड करते, ज्यामुळे गुंतवणूकदारांना आकाराच्या आधारावर वेगवेगळ्या गतीच्या धोरणांमध्ये गुंतवणूक करण्याची गरज नाहीशी होते.

या लॉन्चबद्दल ॲक्सिस म्युच्युअल फंडाचे एमडी आणि सीईओ, श्री. बी. गोपकुमार म्हणाले, "गुंतवणूकदारांना नावीन्यपूर्ण गुंतवणूक उपाय प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणजे आम्ही ॲक्सिस निफ्टी500 मोमेंटम 50 इंडेक्स फंड लाँच करताना उत्साहित आहोत. पॅसिव्ह धोरण ही लोकप्रियता मिळवत राहिल्याने, हा फंड भारतातील सर्वात आश्वासक गती-चलित समभागांमध्ये गुंतवणूक करण्याची अनोखी संधी देईल, सर्व खर्च कमी ठेवून आणि व्यापक विविधता सुनिश्चित करेल, याचा आम्हाला विश्वास आहे. स्टॉक निवडीचे निर्णय न घेता बाजारातील ट्रेंडचा फायदा घेऊ पाहणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी ही एक आदर्श संधी आहे."

ॲक्सिस निफ्टी 500 मोमेंटम 50 इंडेक्स फंडाचे व्यवस्थापन श्री. कार्तिक कुमार (इक्विटी फंड मॅनेजर) आणि श्री. सचिन रेळेकर (वरिष्ठ इक्विटी फंड मॅनेजर) करतात. अर्जाची किमान रक्कम रु. 100 आणि त्यानंतर रु.1/- च्या पटीत. निफ्टी 500 मोमेंटम इंडेक्स असलेल्या समभागांमध्ये गुंतवणूक करून ही योजना निष्क्रिय गुंतवणूक धोरणाचा अवलंब करते.

ॲक्सिस म्युच्युअल फंडाचे सीआयओ श्री. आशिष गुप्ता म्हणाले की, "निफ्टी500 मोमेंटम 50 निर्देशांकाने भारताच्या गतिशील बाजार वातावरणात लवचिकता दर्शविली आहे, अनेकदा वाढीसाठी तयार असलेल्या स्टॉकची ओळख करून व्यापक बाजार निर्देशांकांना मागे टाकले आहे. या गती-चालित दृष्टीकोनाचा उद्देश अलीकडे तेजीत असलेल्या शेअर्सचे भांडवल करणे हा आहे. या पार्श्वभूमीवर, ॲक्सिस निफ्टी 500 मोमेंटम 50 इंडेक्स फंड हे एक सरलीकृत निष्क्रिय धोरण आहे जे गुंतवणूकदारांना भारतीय कंपन्यांच्या स्पेक्ट्रमच्या विस्तार वाढीत सहभागी होण्यासाठी एक सोपा पण प्रभावी मार्ग ऑफर करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

आमचा विश्वास आहे की, शाश्वत दीर्घकालीन परताव्याच्या संभाव्यतेसह, फंडाचा व्यापक दृष्टीकोन दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी एक मजबूत वाहन म्हणून काम करेल, ज्यामुळे तो नवीन आणि अनुभवी दोन्ही गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक पर्याय ठरेल."

## थोडक्यात



## कॉर्पोरेट गव्हर्नन्स एक्सलन्स समिट आणि अवॉर्ड्स २०२५ चे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : वर्ल्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (WDC)व डायरेक्टर्स इन्स्टिट्यूट- वर्ल्ड कौन्सिल ऑफ डायरेक्टर्स (Directors' Institute - World Council of Directors)ह्यांच्या पुढाकाराने आणि वर्ल्ड असोसिएशन फॉर स्मॉल अँड मीडियम एंटरप्रायझेस (WASME) यांच्या सहकार्याने भारतातील सर्वात मोठी कॉर्पोरेट गव्हर्नन्स एक्सलन्स समिट आणि अवॉर्ड्स २०२५ चे आयोजन करण्यात आले. पुण्यात झालेल्या या परिषदेमध्ये १००० हून अधिक सीएक्सओ आणि ३५ पेक्षा अधिक आघाडीच्या सर्च फर्म्सने सहभाग घेतला . ESG(पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासन) आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्स क्षेत्रात , नैतिक आणि नाविन्यपूर्ण नेतृत्वाचा गौरव आला . या सत्रांमध्ये श्री सुरेश प्रभू, श्री एम. दामोदरन आणि श्री योगेश कदम यांच्यासह १५+ राष्ट्रांच्या राजदूतांनी शाश्वतता आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सवर वर आपले विचार मांडलेत. या शिखर परिषदेत वकीली आणि न्यायदान पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणणारे आर्टिफिशियल इंटेलिजन्स -चालित संकेतस्थळ - लॉटेक (www.law-tech.co.in) आणि वरिष्ठ सीएक्सओ किंवा बोर्ड पदांचा शोध सुलभ करण्यासाठी व पारंपारिक पद्धतींद्वारे सहज उपलब्ध नसलेल्या उच्च-स्तरीय वरिष्ठ नेत्यांचे भांडार म्हणून काम करणारे संकेतस्थळ बोर्डसर्च (BoardSearch.ai), ह्या अत्याधुनिक व्यासपिठांचे अनावरण करण्यात आले. प्रशासन आणि नेतृत्वकौशल्य क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ५० हून अधिक प्रतिष्ठित बोर्ड सदस्यांना "प्रेरणादायी बोर्ड संचालक पुरस्कार" प्रदान करण्यात आला. विविधता आणि ट्रान्सजेंडर प्रतिनिधित्वाला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या श्रीगौरी सुहासिनी सुरेश सावंत यांना "जबाबदार आणि प्रभावशाली व्यक्तिमत्व" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याव्यतिरिक्त, जागतिक प्रशासन, नवनिर्मितीमध्ये नेतृत्व करण्याची त्यांची तयारी दर्शविणाऱ्या २५० हून अधिक अधिकाऱ्यांना स्वतंत्र संचालक (Independent Director) आणि आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट संचालक (International Corporate director) या पदव्या प्रदान करण्यात आल्या.

## गुरांची तस्करी करणाऱ्या रॅकेटची पाळेमुळे उखडून टाका : शेखर निकम

- दोषींवर कठोर कारवाईसाठी गृहमंत्र्यांची भेट घेणार

चिपळुण (आरंभ पर्व) : कुंभार्ली घाटातील गुरे तस्करीप्रकरणी घेणारे आणि देणारे अशा सर्वांवर कठोर कारवाई करा तस्करीचे रॅकेट मुळापासून उखडून टाका अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना आमदार शेखर निकम यांनी बुधवारी स्थानिकांसह वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना केल्या आहेत.मंगळवारी रात्री चिपळूण-कराड मार्गावर कुंभार्ली घाटात गुरे तस्करीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आमदार शेखर निकम हे आक्रमक झाले. बुधवारी सकाळपासूनच त्यांनी या प्रकरणी जे कुणी दोषी असतील त्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने पोलीसांकडे चर्चा केली. जिल्हा पोलीस अधिक्षकांशी चर्चा केली त्यानुसार पोलिसांनी गुन्हे ही दाखल केले आहेत. मुळातच गुरे तस्करी ही गंभीर बाब असून त्याची पाळे खोलवर रूजलेली आहेत. त्यामुळे ती मुळापासून उखडून टाकण्याची गरज आहे त्यादृष्टीने पोलिसांनी अशा प्रकरणात देणारे आणि ते घेणारे अशा सर्वांवर कठोर कारवाई होईतल याद्दष्टीने आवश्यक ती पावले उचलावलीत गुरे तस्करीचा पुरता बिमोड करण्याच्यादृष्टीने आपण गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेणार असल्याचे आमदार निकम यांनी पत्रकाराशी बोलताना सांगीतले.

## पॅरागॉन फुटवेअरने वितरक भागीदारांचा केला गौरव

- सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त पुण्यात खास आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील विश्वसनीय फूटवेअर ब्रँड असलेला पॅरागॉन आपला सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे. या निमित्त कंपनीच्या वतीने आपल्या यशात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या वितरक भागीदारांचा गौरव करण्यात आला. तसेच भागीदारांना आणखी बळ देण्यासाठी नवी डिजिटल साधने सादर करण्यात आली. पुण्यातील या कार्यक्रमात नाविन्य आणि सहकार्यावर पॅरागॉनचा असलेला भर अधोरेखित झाला, तसेच पुढील ५० वर्षांच्या वाढीचा आणि उत्कृष्टतेचा पाया घातला. दर्जेदार आणि मजबूत भागीदारींच्या कटिबद्धतेसह आपले व्यापार नेटवर्क सशक्त करणे आणि ग्राहकांचे अनुभव समृद्ध करणे पॅरागॉनने सुरू ठेवले आहे. पॅरागॉनचे मार्केटिंग आणि आयटीचे कार्यकारी उपाध्यक्ष सचिन जोसेफ म्हणाले, कार्यक्षमता आणि उपयोगिता यांच्यासाठी तयार केलेली काही व्यावहारिक डिजिटल साधने पॅरागॉनने सादर केली.व्यावसायिक कार्यांना मजबूती आणण्यासाठी तसेच भागीदारांचे सहकार्य वाढविण्यासाठी ही साधने आणण्यात आली आहेत. यातील व्हॉट्सअॅप चॅटबॉटमुळे उत्पादन कॅटलॉग, ऑर्डर ट्रॅकिंग आणि फीडबॅक यंत्रणा सुलभपणे उपलब्ध होतील तसेच तत्पर कस्टमर सपोर्टची हमी मिळेल. गोल्ड सर्कल लॉयल्टी अ‍ॅपमुळे किरकोळ विक्रेत्यांना अ‍ॅमेझॉनद्वारे सहजपणे पॉइंट मिळवणे आणि रिडीम करणे शक्य होईल, तसेच रिवॉर्ड प्रक्रिया सरळ आणि पारदर्शक होईल. सेल्सफोर्ससोबत सहयोग करून पॅरागॉनने डिस्ट्रिब्युटर मॅनेजमेंट सिस्टम (डीएमएस) विकसित केली आहे. हे उत्पादन लॉजिस्टिक्स सुरळीत करण्यासाठी आणि दैनंदिन कामकाज अनुकूलन करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. त्यामुळे भागीदारांना ग्राहकांशी संबंध बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते.

*प्राईम पार्टनर्स प्रोग्राम : पॅरागॉन प्राईम पार्टनर प्रोग्राम उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांना आधार पुरवते. यामध्ये नवीन उत्पादने लवकर मिळणे, मार्केटिंग सहाय्य आणि वाढीव दृश्यमानतेसाठी दुकान शेल्फ फर्नीचर यांसारखे लाभ मिळतात. साप्ताहिक सप्लाय व्हिजिट आणि अग्रगण्य भागीदारांसह धोरणात्मक चर्चांच्या माध्यमातून ते नियमित कटिबद्धतासुद्धा सोपी बनवते. चांगले सहयोग आणि वाढीच्या संधींना चालना देणे हा त्याचा उद्देश आहे.*

### पेठ येथील ओढ्यात सोडलेल्या पाण्यामुळे

# नागरिकांच्या जीवाशी खेळ



### शासनाचे दुर्लक्ष...

**वाळु व मुरुम काढण्यासाठी शासनाची परवानगी लागती व इथे वाळु काढून सोरतापवाडी हद्दीत धुतली जाते व विक्री केली जाते. तसेच लोणी काळभोर ,म्हातोबाची आळंदी ,तरडे व इतर गावांच्या हद्दीतुन बेसुमार मुरूम उपशा चालू आहे . यावरून शासनाच्या काही अधिकाऱ्यांचे लागेबांधे या वाळु व मुरुम उपसा करणाऱ्यां बरोबर आहे का .? असा प्रश्न नागरिक करत आहेत . मध्यंतरी जलजीवन योजनेसाठी उरुळी कांचन व कोरेगाव मुळ येथील काढलेला मुरुम चोरीला गेला होता .वाळु व मुरूम उपशाकडे शासनाचे पध्दतशीर दुर्लक्ष होत असुन पेठ येथील ओढा असुन सुद्धा त्याचा काहीही उपयोग होत नाही .**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पेठ (ता.हवेली ) हद्दीतुन जाणाऱ्या ओढयात वाळु मिश्रीत मातीमुळे येथील नागरिकांच्या जीवाशी खेळ चालला असुन सोडण्यात येणारे पाणी त्वरित बंद करावे अशी मागणी होत आहे. पेठ हद्दीतुन वाहणारा ओढा हा सोरतापवाडी परिसरातून येतो .तेथे वाळु धुतल्यामुळे त्यातील माती वाहून ती ओढयात मिळते .तो ओढा पेठ ग्रामपंचायतीच्या हद्दीतुन जात असुन माती मिश्रीत पाण्यामुळे त्याचा काही उपयोग होत नाही . उलट ते माणसाच्या आरोग्याला हानीकारक आहे . हे पाणी ओढ्याला सोडण्यात आले आहे. पुर्वी या ओढयाच्या पाण्यामध्ये पेठ येथे महिला धुणे धुवायच्या ,शेळया मेंढ्या याच पाण्यावर आपली तहान भागवायच्या. तर ओढयाकडेच्या विहीरींना सतत पाणी असायचे व ते पाणी शेतीला उपयोगी असायचे. पण आता परिसरातील ओढ्यातून वाहत असलेले पाणी इतके दूषित आहे की यामुळे परिसरात विविध आजार व रोगराई वाढत आहे. त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ओढयात दीड ते दोन फुटांचा वाळु मिश्रीत मातीचा थर साचलेला आहे . त्यामुळे ओढयाचे सौंदर्य नष्ट झाले आहे .वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करुन सुध्दा काही उपयोग झाला नसल्याचे काही ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले .हे सर्व निसर्गाचे क्षेत्र कधी स्वच्छ होणार असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे.

## नोबल हॉस्पिटल तर्फे बाळाचा पाचवा वाढदिवस साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर ने मुदतपूर्व जन्मलेल्या बाळाचा पाचवा वाढदिवस नुकताच साजरा केला. दक्षिण पूर्व पुण्यातील सर्वात मुदतपूर्व बाळांपैकी एक असलेल्या या बाळामध्ये विकासात्मकदृष्टया सामान्य वाढ आणि एकंदर चांगले आरोग्य ही एक अनोखी बाब आहे.

नोबल हॉस्पिटल्स येथील एनआयसीयू मधील वरिष्ठ बालरोग तज्ञ डॉ.अनिल खामकर म्हणाले की,या मुलाचा जन्म 24 व्या आठवड्यात झाला होता.या स्थितीला अतिशय मुदतपूर्व जन्म असे म्हटले जाते.जन्माच्या वेळी त्याचे वजन केवळ 530 ग्रॅम होते.वैद्यक शास्त्र व उपचारामध्ये झालेल्या प्रगतीमुळे मुदतपूर्व जन्मलेल्या बाळांचा जगण्याचा दर वाढला असला तरी अशा बाळांना अनेक वेळा काहीना काही समस्यांचा सामना करावा लागू शकतो. यासाठी स्पीच किंवा ऑक्युपेशनल थेरपीज् सारख्या उपचारांची गरज भासते.त्याचबरोबर आयव्हीएच (मेंदूमध्ये रक्तस्त्राव) चा धोका देखील असतो.बाळ किती मुदतपूर्व जन्मले आहे,त्यानुसार हा धोका वाढू शकतो,कारण रक्तवाहिन्या पूर्णपणे विकसित झालेल्या नसतात आणि नाजूक असतात.

या बाळाच्या बाबतीत आयव्हीएचची कुठली स्थिती उद्भवली नाही,एनआयसीयूमधील त्याच्या वास्तव्याच्या दरम्यान कुठलाही संसर्ग झाला नाही आणि कुठल्याही अँटिबायोटिकची गरज पडली नाही. त्याचे आई-वडील या दोघांनी त्याची काळजी (कांगारू केअर) घेतली. डॉ.खामकर म्हणाले की,संसर्ग किंवा कुठलाही आजार होऊ नये यासाठी नोबल हॉस्पिटलच्या एनआयसीयूच्या प्रस्थापित कठोर मापदंडाचे पालन करण्यात आले.यामुळे एनआयसीयूच्या वास्तव्यादरम्यान बाळाला कुठलाही संसर्ग झाला नाही.

नोबल हॉस्पिटल्समधील बालरोग तज्ञ डॉ.पी.डी.पोटे म्हणाले की,योग्य आहार ही देखील या स्थितीमधील सर्वात महत्त्वाची बाब असते.चांगला आहार आणि शुश्रुषा मुळे बाळाची वाढ एनआयसीयूदरम्यान आणि नंतर सामान्यपणे होत राहिली.

## अंगावर ट्रॅक्टर घालून भावाचा खून करणाऱ्याला जन्मठेप

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

अंगावर ट्रॅक्टर घालून चुलत भावाचा खून करणाऱ्या आरोपीला राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. पी. पोळ यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. दुसऱ्याच्या ट्रॅक्टरने शेताची नांगरणी केली याचा राग आल्याने आरोपीने हे कृत्य केले होते.

जयनाथ सोपान मनसुख (वय ३८, रा. एकनाथवाडी, सावरगाव, ता. जुन्नर) असे जन्मठेप सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. नोव्हेंबर २०२० मध्ये घडलेल्या या घटनेत प्रकाश नामदेव मनसुख (वय ६०) यांचा मृत्यू झाला होता. आरोपी आणि मयत प्रकाश चुलत भाऊ आहेत. आरोपी जयनाथ याच्याकडे ट्रॅक्टर होता. त्या ट्रॅक्टरने तो प्रकाश यांच्या जमिनीची नांगरणी करीत होता. किरकोळ कारणातून त्यांच्यात वाद झाल्यावर प्रकाश यांनी गावातील दुसऱ्या व्यक्तीचा ट्रॅक्टर भाडोत्री घेऊन त्याने शेतीची नांगरणी करून घेतली. त्याचा राग अनावर होऊन आरोपीने प्रकाश यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना गंभीर जखमी केले होते. प्रकाश यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्याच रात्री त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

याबाबतचा खटला राजगुरुनगर न्यायालयात सुरू होता. त्याचा निकाल देण्यात आला. यामध्ये आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. प्रकाश यांच्या बाजूने सहायक सरकारी अभियोक्ता व्ही. एन. देशपांडे यांनी युक्तिवाद केला.

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला रविवारपासून

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात रविवार दि. २६ जानेवारी ते शनिवार दि.१ फेब्रुवारी दरम्यान साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते.

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आयोजनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेली ही व्याख्यानमाला सकाळच्या सत्रात होत असून व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर ७ हजारांवर विद्यार्थी, प्राध्यापक, पालक व ग्रामस्थांची उपस्थिती हे या व्याख्यानमाळेचे ठळक वैशिष्टे आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात दररोज सकाळी दहा ते साडेअकरा या वेळात ही सर्व व्याख्याने होणार आहेत. व्याख्यानमालेचे हे २२ वे वर्ष आहे.



**महाविद्यालयात दर्जेदार व्याख्याते आणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या समोर प्रेरणादायी विचार व आदर्श ठेवण्यासाठी संस्थेच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेच्या निमित्ताने तालुक्यातील सर्व नागरिकांनी, माजी विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेऊन व्याख्यानमालेच्या वैचारिक मेजवानीचा, शब्दमहोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे व एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे यांनी केले आहे.**

व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प रविवारी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड हे 'अहद ऑस्ट्रेलीया तहद कॅनडा - अवघा मुलुख आपला..' या विषयावर गुंफणार आहेत. प्रजासत्ताक दिनामुळे हे व्याख्यान सकाळी साडेआठ वाजता सुरू होईल.

सोमवारी (दि.२७) सुप्रसिद्ध लेखिका अनुराधा प्रभुदेसाई ह्या 'ऋणानुबंध सैनिकांशी' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. मंगळवारी ( दि.२८) हरियाणा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रेणू भाटीया ह्या मैं 'रेणू भाटीया' या विषयावर बोलणार आहेत. बुधवारी (दि.२९) पत्रकार संजय आवटे हे 'चला उभारू नवी पिढी ' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. गुरूवारी (दि.३०) यशस्वी उद्योजक रामदास माने हे 'कसा घडतो उद्योजक' या विषयावर आपले अनुभव मांडणार आहेत.

शुक्रवारी (दि.३१) प्रसिद्ध कवी व व्याख्याते अनंत राऊत हे 'माझ्या कविता तुमच्यासाठी' या विषयांतर्गत कवितांचे सादरीकरण करणार आहेत. शनिवारी (दि.१) ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. श्रीपाद सबनीस हे 'भारतीय स्वातंत्र्य व देशाचे भवितव्य' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत.

## संविधान सन्मान दौड २०२५ च्या जर्सीचे अनावरण

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

भारतीय संविधान दिन अमृत महोत्सवी वर्षा निमित्त 'संविधान सन्मान दौड 2025 ' चे आयोजन येत्या 25 जानेवारी 2025 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था ( BARTI), संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी अ‍ॅथलेटीक्स असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. या मिनी मॅरेथॉन मध्ये पुणेकरांसह देश , विदेशातील सुमारे 10 हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहेत. संविधान सन्मान दौड 2025 च्या जर्सीचे अनावरण आज मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष व 'संविधान सन्मान दौड' चे मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. विजय खरे ( विभाग प्रमुख संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), महोत्सव समितीचे सचिव दीपक म्हस्के, विजय सोनिगरा आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बोलताना परशुराम वाडेकर म्हणाले, संविधान सन्मान दौड चे यंदा तिसरे वर्ष आहे, मागील वर्षी प्रमाणे यंदाही स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे नांव नोंदणी मधुन दिसते. येत्या 25 जानेवारी रोजी संविधान सन्मान दौड ची सुरुवात सकाळी 5.30 वा. सावित्रीाई फुले पुणे विद्यापीठच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुलातून होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असून याप्रसंगी Preamble to the Constitution of India (भारतीय संविधानाची उद्देशिका) वाचन होणार आहे, स्पर्धेचे पारितोषिक वितरण सकाळी 8 वा. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे.




# 'बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे सीझन ३'ची घोषणा

- घेऊन येणार मराठी चित्रपटांच्या, नाटकांच्या पडद्या मागच्या कहाण्या आणि किस्से
- बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे सीझन ३ चा प्रीमियर २७ जानेवारी रोजी बिग एफएमवर, मराठी चित्रपटसृष्टीच्या अस्सल कहाण्या आणि किस्से घेऊन येणार




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या रेडिओ नेटवर्कपैकी एक असलेले बिग एफएम मराठी चित्रपट उद्योगाचा वारसा साजरा करत आपला बहुप्रतिक्षित शो बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे घेऊन येत आहे. मराठी चित्रपटातील मनोरंजक किस्से आणि नॉस्टॅल्जिक प्रवासासाठी ओळख असलेल्या या शोच्या तिसरा सीझनची औपचारिक घोषणा करण्यात आली. प्रसिद्ध अभिनेते सुबोध भावे यांच्या उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. नाविन्यपूर्ण थीम आणि आकर्षक आशयाने भरलेला हा नवा सीझन मराठी सिनेमाच्या अनोख्या आणि कालातीत वारसा गौरव करेल. तसेच श्रोत्यांचे मराठी सिनेमाशी असलेले नाते बळकट करेल. हा शो पुण्यात सोमवार-शनिवारी संध्याकाळी ७ ते ८ आणि रविवारी, सकाळी ७ ते १० या वेळेत पुणे आणि मुंबई या दोन्ही ठिकाणी फक्त बिग एफएमवर २७ जानेवारी रोजी प्रीमियरसाठी सज्ज आहे.

अष्टपैलू प्रतिभा असलेले अभिनेते, लेखक, निर्माता आणि दिग्दर्शक सुबोध भावे पुन्हा एकदा यजमानपदाची धुरा सांभाळत मराठी चित्रपटसृष्टीचे सार आणि माहात्म्य सांगणार आहेत. आपल्या उत्कृष्ट निवेदनाच्या माध्यमातून सुबोध भावे हे प्रेक्षकांना सिनेसृष्टीच्या रोमांचक सफरीवर घेऊन जातील आणि त्यातील सर्वोत्कृष्ट क्षण पुढे आणतील. सीझन ३ हा मनोरंजक अशा 'जोडी स्पेशल' संकल्पनेवर आधारित असेल, यामध्ये काही प्रतिष्ठित जोड्यांचा गौरव करण्यात येईल. यात ऑन-स्क्रीन आवडत्या जोड्यांपासून ते गायक-संगीतकार, दिग्दर्शक-अभिनेता आणि गीतकार-संगीतकार यांच्यासारख्या सर्जनशील सहकाऱ्यांचा समावेश असेल. यात श्रोते त्यांच्या आवडत्या ताऱ्यांना गाणी समर्पित करून त्याला वैयक्तिक स्पर्श देऊ शकतील. त्यातून चाहते आणि त्यांच्या प्रिय दिग्गजांमध्ये अनोखा बंध निर्माण होईल.

बिग मराठी बायोस्कोपचा तिसरा सीझन मराठी इंडस्ट्रीची जादू उलगडून दाखवेल. यात अपरिचित कथांचा शोध घेत सकारात्मक सामाजिक बदल घडवणाऱ्या सेलिब्रिटींच्या जीवनाचा वेध घेण्यात येईल. मनोरंजन आणि अर्थपूर्ण निवेदनाच्या या मिलाफातून मराठी चित्रपटसृष्टीला मनापासून दाद मिळेल. त्यातून संस्कृती आणि समुदाय दोन्हींचा गौरव होईल.

आपला उत्साह व्यक्त करताना सुबोध भावे म्हणाले, "बिग मराठी बायोस्कोपचा आणखी एक सीझन होस्ट करताना मला खूप आनंद होत आहे, विशेषत: गेल्या दोन सीझनमध्ये प्रेक्षकांच्या असामान्य प्रतिसादानंतर. माझ्या दृष्टीने निवेदनाची खरी ताकद ही अर्थपूर्ण बंध निर्माण करण्याच्या क्षमतेमध्ये असते. या बंधाला पोषक ठरणारे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी बिग एफएमचा आभारी आहे. हा सीझन नवीन घटक घेऊन येत आहे आणि तो श्रोत्यांच्या मनाला अजूनही अधिक साद घालेल. त्यामुळे ते कलावंत आणि त्यांना आवडत असलेल्या गोष्टींच्या आणखी जवळ येतील, याची मला खात्री आहे."

बिग एफएमचे सीओओ सुनील कुमारन पुढे म्हणाले, "बिग एफएमवर प्रेक्षकांशी वैयक्तिक पातळीवर जोडणारा आशय तयार केल्याचा आम्हाला अभिमान आहे. बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे हा कार्यक्रम याचा अस्सल पुरावा आहे. मागील दोन सीझनच्या प्रचंड यशामुळे मराठी सिनेसृष्टीच्या चाहत्यांचा या शोसोबतशी असलेला गहिरा संबंध स्पष्ट होतो. सुबोध भावे हे होस्ट असल्यामुळे तिसरा सीझन प्रेक्षकांच्या सहभागाचा नवीन मापदंड निर्माण करेल, याचा आम्हाला विश्वास आहे. या प्रवासाला आकार देणाऱ्या प्रायोजकांच्या दृढ पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत."

एक विलक्षण अनुभव देण्याची खात्री असलेल्या बिग मराठी बायोस्कोप विथ सुबोध भावे सीझन ३ चे प्रायोजक लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑप सोसायटी लिमिटेड हे असून देशपांडे आय हॉस्पिटल आणि लेझर सेंटर सह-प्रायोजक आहेत. व्हॅलेंटीना इंडस्ट्रीज हे सहयोगी प्रायोजक असून त्यांना टेलिकास्ट पार्टनर म्हणून साम टीव्ही यांची साथ आहे. इंडियन ऑईल या कार्यक्रमाचे पार्टनर आहेत. हा शो सोमवार ते शनिवार संध्याकाळी ७ ते ८ या वेळेत पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, सोलापूर, कोल्हापूर आणि नागपूरसह अनेक शहरांमध्ये प्रसारित होईल. रविवारी पुणे, मुंबई, गोवा, इंदूर आणि नागपूर येथे सकाळी ७ ते १० आणि अहिल्यानगर , छत्रपती संभाजी नगर, सोलापूर आणि कोल्हापूर येथे सकाळी ८ ते ११ या वेळेत त्याचे प्रसारण होईल.

या सीझनचा समारोप पुण्यात एका ग्रँड फिनालेने होईल, त्यात मराठी चित्रपटसृष्टीवर अमिट ठसा उमटवणाऱ्या प्रतिष्ठित सेलिब्रिटी जोडींचा समावेश असेल. बिग एफएमच्या ऑन-एअर प्रोग्रामिंग, सोशल मीडिया चॅनेल आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्मवरील व्यापक प्रमोशनमुळे या शोची पोहोच आणखी वाढली आहे. त्यामुळे व्यापक प्रसार आणि सहभागाची खात्री मिळणार आहे.

## थोडक्यात



### लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या कार्यशाळेतून लोककलेचा जागर

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आयोजित आणि भारतीय लोककला अभ्यास संशोधन कल्याण केंद्र व सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने व फोकलोर अँड क्लचरल हेरीटेज फाउंडेशन पुणे यांच्या समन्वयातून व्याख्यान, परिसंवाद, कार्यशाळा, शोधनिबंध वाचन, लोकसंस्कृती विषयक सांस्कृतिक कार्यशाळाचे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ येथे केले होते. या दोन दिवशी कार्यशाळेमध्ये पहिल्या दिवशी लोकसंस्कृतीतील मौखिक परंपरा, परिसंवाद लोकसंस्कृतीची बलस्थाने आणि मर्यादा, परिसंवाद लोकसंस्कृतीतील स्त्री जीवन, शोधनिबंध वाचन, अंबाजोगाईची लळीत परंपरा, आदिवासी बोहाडा, पिंगळा, भारुड, गायन, लोकसंगीत मोठ्या उत्साहात पार पडले. तर दुसऱ्या दिवशी लोक दैवत संप्रदाय आणि भक्ती संप्रदाय, लोकरंगभूमीच्या भौतिक संस्कृतीमधील तथ्य आणि मिथक, लोक संस्कृतीतील रंजानात्मक अविष्कार, कळसूत्री बाहुल्या, गोंधळ जागरण, लोकजीवनातून लुप्त झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण म्हणी, वाक्यप्रचार, उखाणे, कोंडी यांचे लोककथेच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले. कथक आणि लावणी जुगलबंदी सादर करून या लोकसाहित्य व लोकसंस्कृती कार्यशाळेची सांगता करण्यात आली. सदरील कार्यशाळेला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद मिळाला. यामध्ये तरुणाई पासून वयोवृद्धांपर्यंत आवर्जून उपस्थिती लावली होती. सदरील महोत्सवाचे संयोजक सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे आणि लोकसाहित्य आणि फोकलोर अँड क्लचरल हेरीटेज फाउंडेशन समन्वयक डॉ.सुनीता धर्मराव होत्या. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या मार्फत अशाच कार्यशाळा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घेतल्या जाणार असून अशा कार्यशाळांतून लुप्त होत चाललेल्या लोककला, लोकसंस्कृती व कलाकारांना नवसंजीवनी देण्यात येणार आहे. अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली.

### पुणे मराठी टोस्टमास्टर्स मंडळ तर्फे कथाकथन स्पर्धा

पुणे (आरंभ पर्व) : टोस्टमास्टर्स डिस्ट्रीक्ट 125 चा उपक्रम असलेल्या पुणे मराठी टोस्टमास्टर्स मंडळ तर्फे शनिवार,1 फेब्रुवारी 2025 रोजी सीओईपी भाऊ इन्स्टिट्युट,शिवाजीनगर येथे सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या मनातील कथा इतरांपर्यंत पोहचविण्यासाठी आणि एक नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्दिष्टाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत 18 वर्षावरील कोणतीही व्यक्ती सहभागी होऊ शकते.प्रत्येकाने 3 ते 5 मिनिटांत आपल्या कथा प्रेक्षकांसमोर मराठी भाषेत मांडायच्या आहेत. पुणे मराठी टोस्टमास्टर्स मंडळाच्या अध्यक्ष अर्चना पांडे म्हणाल्या की,आपले अनुभव,विचार आणि कल्पनांना शब्दांत गुंफून इतरांपर्यंत पोहचविण्याचे हे एक योग्य व्यासपीठ आहे. पुणे मराठी टोस्टमास्टर्स मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आपले सार्वजनिक वक्तृत्व,संवाद कौशल्य आणि नेतृत्व कौशल्याला प्रोत्साहन देणे हे आहे. यासाठी नोंदणी शुल्क रूपये 150 असून 26 जानेवारी 2025 पर्यंत नोंदणी सुरू राहील. अधिक नोंदणीसाठी https://www.meraevents.com/event/pmtmc-storytelling-contest फॉर्म किंवा अर्चना – ८६२४०३१२४९, ज्योती – ७८३८६१३५०६ या क्रमांकावर संपर्क साधा.

# डॉ. सायरस एस. पूनावाला यांना पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) यांनी त्यांच्या प्रमुख उपक्रम 'मुंबई बायोक्लस्टर' अंतर्गत, दुसऱ्या डॉ. के. अंजी रेड्डी मेमोरियल फेलोशिप फॉर अफोर्डेबल बायोफार्मास्युटिकल्स हा मानाचा पुरस्कार सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष, डॉ. सायरस एस. पूनावाला यांना प्रदान केला. बायोफार्मास्युटिकल इनोव्हेशन आणि जागतिक आरोग्यासाठी त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला. हा फेलोशिप इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मुंबईने डॉ. के. अंजी रेड्डी यांच्या स्मरणार्थ स्थापन केला आहे, ज्यांनी भारतीय औषध उद्योगात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

हा पुरस्कार २१ जानेवारी २०२५ रोजी पुण्यातील हॉटेल रिट्झ कार्लटनमध्ये झालेल्या विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त डॉ. आर. ए. माशेलकर उपस्थित होते. या समारंभाचे संयुक्तपणे आयोजन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाने केले. या समारंभात प्रा. अिनरुद्ध बी. पंडित, कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मुंबई आणि मा. चंद्रकांत (दादा) पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उपस्थित होते.



**डॉ. रत्नेश जैन, संस्थापक, मुंबई बायोक्लस्टर यांनी सांगितले, "इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मुंबई यांच्या नेतृत्वाखालील मुंबई बायोक्लस्टर हा एक परिवर्तनकारी उपक्रम आहे, जो शैक्षणिक संस्था, उद्योग आणि धोरणनिर्मात्यांना जोडतो. तसेच सहकार्याला प्रोत्साहन देत, हा उपक्रम बायोफार्मास्युटिकल इनोव्हेशनसाठी प्रेरणादायी शक्ती ठरतो, स्टार्टअप्सला सक्षम करून परवडणाऱ्या आरोग्य सेवा उपायांच्या विकासाला गती देतो, ज्यामुळे भारताची जागतिक बायोफार्मा क्षेत्रातील स्थान मजबूत होते. इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) आणि आमच्या प्रमुख मुंबई बायोक्लस्टरमध्ये डॉ. पूनावालांना हा योग्य सन्मान प्रदान करणे एक मोठे गौरवाचे बाब आहे. आम्ही त्यांना आपले मानून आणि एक प्रेरणादायक माजी विद्यार्थी म्हणून खूप गर्वित आहोत."**

**कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मविभूषण डॉ. आर. ए. माशेलकर म्हणाले, "डॉ. सायरस एस. पूनावाला हे 'जिवंत आख्यायिका" आहेत, जे डॉ. के. अंजी रेड्डी यांच्या दृष्टीकोन आणि तत्त्वांशी सुसंगत आहेत आणि जे इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) चे माजी विद्यार्थि देखील आहेत. जसे डॉ. रेड्डी यांनी रेड्डी लॅब्सची स्थापना केली आणि औषध क्षेत्रात एक शाश्वत वारसा निर्माण केला, तसेच डॉ. पूनावालांचे वारसा सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मार्फत जागतिक आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवून जीवनरक्षक लसींना परवडणारे आणि जगभरातील लोकांसाठी उपलब्ध करून देण्यात आहे."**

पुरस्कार स्वीकारताना डॉ. सायरस एस. पूनावाला म्हणाले, "मला मिळालेल्या सर्व पुरस्कारांपैकी डॉ. के. अंजी रेड्डी मेमोरियल पुरस्कार माझ्यासाठी विशेष आहे, कारण तो परवडणाऱ्या औषधांच्या महत्त्वाला अधोरेखित करतो. जागतिक उत्पादकांप्रमाणे ज्यांना सरकारकडून अब्जोंची आर्थिक मदत मिळाली, त्यामध्ये आम्ही सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मध्ये केवळ आपल्या स्वतःच्या बचतींवर आणि संसाधनांवर अवलंबून राहून कोविड-१९ लस जलद गतीने तयार केली. आम्ही लसच्या सुरक्षा आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी मोठा वैयक्तिक आणि आर्थिक धोका घेतला, आणि लायसन्स मिळण्याआधीच आम्ही स्वतः लसीचे प्रारंभिक डोस घेतले होते."

या कार्यक्रमादरम्यान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. चंद्रकांत (दादा) पाटील, म्हणाले,

"डॉ. पूनावाला आणि सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (SII) यांनी स्तन आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून मुलींचे संरक्षण करणारी लस विकसित करण्याच्या दिशेने घेतलेली पुढाकार अतिशय महत्त्वाची आहे. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी आपले सरकार लवकरच एक मोहिम राबवण्याचा विचार करत आहे. जसे भारताने पोलिओमुक्ती मिळवली, तसेच आपल्या देशातील महिलांवर कर्करोगाचा धोका दूर करण्याचे स्वप्न आम्ही पाहत आहोत. सायरस पूनावाला आणि त्यांच्या समर्पित टीमने या दिशेने चालवलेल्या अथक प्रयत्नांचे आम्ही स्वागत करतो."

समारंभाच्या निमित्ताने इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मुंबई चे कुलगुरू, प्रा. ए. बी. पंडित, यांनी सांगितले, "मुंबई बायोक्लस्टर ही एक संस्था आहे जी (ICT) च्या परिसराजवळ स्थापित आहे.

सध्या तेथे अनेक औषधे आणि औषधांचे उत्पादन सिंथेटिक रासायनिक पदार्थांचा वापर करून केले जाते. परंतु, नैसर्गिक पद्धतीने त्यांचे उत्पादन केल्यास दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात.

## कल्याणी स्कूल, लोयोला एचएसचे दिवसभरात दोन विजय

**पुणे, (दै. आरंभ पर्व)**

कल्याणी स्कूल आणि लोयोला एचएसने आपले दोन्ही सामने जिंकून सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर लीगमधील फुटबॉल स्पर्धेत अव्वल स्थान मिळविले. सेंट व्हिन्सेंटच्या जीवांश व्यासने हॅट्ट्रिकसह 4 गोल करताना सेंट व्हिन्सेंट्सच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर लीग फुटबॉल स्पर्धेच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिली हॅट्ट्रिक ठरली.

सेंट व्हिन्सेंट्स एचएस मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत कल्याणी स्कूलने प्रथम फादर अॅग्नेलला 3-1 आणि नंतर क्लाइन मेमोरियल स्कूलला 1-0 असे हरवले. फादर अॅग्नेलविरुद्ध कल्याणी स्कूलकडून विहान साहू, विराज चचोंडिया, अक्षज अग्रवालने प्रत्येकी एक गोल केला. प्रतिस्पर्धी संघाकडून तनिश बेगेने गोल केला. क्लाइन मेमोरियल स्कूलविरुद्ध कल्याणी स्कूलसाठी विराज चचोंडियाने निर्णायक आणि एकमेव गोल केला.

लोयोला एचएसने शार्दुल मनोहरच्या गोलच्या जोरावर एचडीएफसी स्कूलविरुद्ध 1-0 असा विजय मिळवला. अन्य सामन्यांत लोयोला एचएसने सेंट पॅट्रिक्सचा 3-0 असा पराभव केला. त्यात केनिथ सॅमसन, निवेद नायर, शौन गायकवाडचे गोल महत्वपूर्ण ठरले.

यजमान सेंट व्हिन्सेंट्स एचएसने दस्तूर को-एड संघाचा 4-0 असा धुव्वा उडविला. हॅट्ट्रिकसह चार गोल करणारा जीवांश व्यास हा त्यांच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

विद्या व्हॅली, हचिंग्ज, एरिन नागरवाला, हिलग्रीन फादर अॅग्नेल आणि एचडीएफसी स्कूल हे विजय मिळविणारे अन्य संघ होते ज्यांचा एक सामना अनिर्णित राहिला. विद्या व्हॅलीने श्री श्री रविशंकरचा 3-0 तसेच हचिंग्जने श्री श्री रविशंकरचा 2-0 असा पराभव केला. नागरवालाने दस्तूर को-एडवर 6-0 असा मोठा विजय मिळवला. त्यात ऋत्विक बिश्त (3 गोल), आरव सोनवणे (2) आणि कृष्ण (1 गोल) चमकले. हिल ग्रीनने अनस जमादार (3) आणि हिमांशू चेरेच्या (1) गोलच्या जोरावर दस्तूर को-एडचा 4-0 असा पराभव केला.

इतर लढतींमध्ये, फादर अॅग्नेलने दस्तूर को-एडवर 2-0 अशी मात केली. दोन्ही गोल दर्शन गायकवाडने (2) केले.

## केंद्रीय अर्थसंकल्पकडून अपेक्षा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

2024 मध्ये भारताच्या स्थावर मालमत्ता क्षेत्रात जोरदार पुनर्प्राप्ती झाली, निवासी मागणी 11 वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आणि कार्यालयीन भाडेपट्टीने विक्रमी 53.3 दशलक्ष चौरस फूट गाठले. तथापि, परवडणाऱ्या घरांना आव्हानांचा सामना करावा लागला, त्याचा विक्रीचा वाटा 2019 मधील 38% वरून फक्त 18% वर आला. 2025 साठी, आम्हाला अपेक्षा आहे की केंद्रीय अर्थसंकल्पात गृहनिर्माणासाठी पायाभूत सुविधांची स्थिती, परवडणारी वित्तपुरवठा आणि पत-संलग्न अनुदान योजना पुन्हा सुरू करणे आणि बाजारपेठेची वास्तविकता प्रतिबिंबित करण्यासाठी किंमतीच्या मर्यादेत सुधारणा करणे यासारख्या सुधारणांद्वारे परवडणाऱ्या गृहनिर्माण विभागाला पुनरुज्जीवित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.



श्री पीयूष रांभिया – पार्टनर्स, पॅलेडियन पार्टनर्स लिमिटेड

## CheQ कंपनी Wisor लॉन्च करत आहे एआय क्रेडिट कार्ड तज्ज्ञ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

CheQ ही कंपनी भारतातील फिनटेक क्षेत्रात आघाडीवर आहे. फ्लिपकार्टचे (Flipkart) माजी कार्यकारी अधिकारी आदित्य सोनी यांनी CheQ ची स्थापन केली. CheQ ने Wisor नावाचे एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारा चालविले जाणारे क्रेडिट कार्ड तज्ज्ञ तयार केले आहे. हे साधन वापरकर्त्यांना त्यांच्या क्रेडिट कार्डच्या वापराच्या बाबतीत अधिक सुव्यवस्थित आणि समजण्यासाठी सोपे वातावरण प्रदान करते. बदल घडवून आणणारी ही नवकल्पना, लाखो भारतीय लोकांच्या क्रेडिट कार्डसशी संवाद साधण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल करणार आहे. ही नवीन क्रांतीकारी नवकल्पना भारतीयांना त्यांच्या क्रेडिट कार्डासोबत संवाद साधण्याच्या पद्धतीला पुन्हा एकदा नव्याने परिभाषित करणार आहे. या नवकल्पनांमुळे प्रत्येक वापरकर्त्याला त्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार किंवा आवडीनुसार माहिती मिळेल. हे उत्पादन व्यवस्थापन सोपे करेल आणि या नवकल्पनेद्वारे लोकांना त्यांच्या क्रेडिट कार्डसंदर्भात मिळणारे फायदे जास्तीत जास्त वाढवता येतील. हे सर्व त्यांच्या अगदी सहज पोहोचण्याजोग्या ठिकाणी, म्हणजेच अगदी बोटांच्या टोकावर उपलब्ध असेल. Wisor हे फक्त आणखी एक वैशिष्ट्य नाही, तर ते क्रेडिट कार्ड व्यवस्थापनात एक क्रांती आहे. ते अत्याधुनिक एआयवर आधारित आहे.

## सुरक्षीत सेवा हा कर्मयोग खऱ्या अर्थाने एसटी कर्मचारी आचरणात आणतात : पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राऊत

**किरण खुडे -राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

एसटी महामंडळाचे कर्मचारी योग्य प्रशिक्षण घेऊन रस्त्यावर वाहन चालवत असतात. प्रवाशांसाठी सुरक्षीत सेवा हा कर्मयोग खऱ्या अर्थाने ते आचरणात आणतात. खाजगी वाहन चालकांनी त्यांचा आदर्श घेऊन सुरक्षीत वाहने चालवावीत, असे मत खेड पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक (वाहतूक) ज्ञानेश्वर राऊत यांनी येथे प्रतिपादन केले.

येथील राजगुरुनगर एसटी आगारात सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, पोलीस हवालदार समर्थ कापरे, वाहतूक निरीक्षक तुकाराम पवळे, कार्यशाळा अधिक्षक अनंत कुंदे, सहायक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, नासिर हवालदार उपस्थित होते.




पुढे बोलताना ते म्हणाले, दुचाकीस्वार घाईगडबडीत पुढे जाण्याच्या प्रकाराने अनेकदा अपघात घडतो, परंतु घटनास्थळी मोठ्या वाहनांला दोषी धरलं जातं. ही मानसिकता समाजाने बदलली पाहिजे.

आगारव्यवस्थापक उज्वला कुटे म्हणाल्या, दैनंदिन जीवनात आपण आरोग्याची काळजी जशी घेतो तशी काळजी घेऊन अपघात न घडता चालकांनी काळजीपूर्वक बस चालवावी आणि सकारात्मक मानसिकता ठेवावी.

यावेळी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे व मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी लिपिक पुष्पा चासकर, स्नेहा कातोरे, मनिषा सुतार, रुपाली मरभळ, वाहतूक नियंत्रक गुलाब तिटकारे, संभाजी शिंदे, महादेव तुळसे, रविंद्र राठोड, शिवाजी शिंदे, रुपेश माने यांसह सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दत्तात्रय गभाले यांनी केले तर आभार नागेश्वर वैरागर यांनी मानले.

## एल अँड टी फायनान्स लिमिटेडला (एलटीएफ) ३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या नऊमाहीत विक्रमी २,००७ कोटी रुपये कॉन्सॉलिडेटेड प्रॉफिट आफ्टर टॅक्स (पीएटी) ३१ डिसेंबर २०२३ अखेर संपलेल्या

# नऊमाहीच्या तुलनेत १४ टक्के वाढ

- **३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीतील एकत्रित कॉन्सॉलिडेटेड प्रॉफिट आफ्टर टॅक्स ६२६ कोटी रुपये**
- **भक्कम रीटेल फ्रँचायसी व ९२,२२४ कोटींचे रीटेल बुक, वार्षिक तत्त्वावर २३ टक्के वाढ**
- **३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत रीटेल कर्जवितरण वार्षिक तत्त्वावर ५ टक्क्यांनी वाढून १५,२१० कोटी रुपये**
- **३१ डिसेंबर २०२४ अखेर PLANET अॅप डाऊनलोडची संख्या १.५ कोटींच्या पुढे**
- **३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत एल अँड टी फायनान्सतर्फे RAISE' 24 हा भारताचा बँकिंग, वित्तीय सेवा व विमा क्षेत्रामधील प्रमुख आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) कार्यक्रम सादर, नॉलेजेबल एआय (KAI) हा एआय-आधारित व्हर्च्युअल होम लोन अॅडव्हायजर सादर, ग्राहक कर्जपुरवठा रुपांतरासाठी अॅमेझॉन पेसमवेत सहयोग आणि कृषी उपकरणे कर्जपुरवठ्यासाठीही प्रोजेक्ट सायक्लॉप्सचा विस्तार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (एनबीएफसी) एक आघाडीच्या एल अँड टी फायनान्स लिमिटेडने (एलटीएफ) ३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या नऊमाहीत २,००७ कोटी रुपये पीएटी नोंदवला आहे. ३१ डिसेंबर २०२३ अखेर संपलेल्या नऊमाहीच्या तुलनेत ही वाढ १४ टक्के आहे. ३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत एकत्रित पीएटी ६२६ कोटी रुपये झाला आहे.

३१ डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत कंपनीने १५,२१० कोटी रुपये रीटेल कर्जवितरण केले असून वार्षिक तत्त्वावर त्यात ५ टक्के वाढ झाली आहे. एकूण रीटेल कर्जपुरवठा (बुक साईझ) या तिमाहीदरम्यान ९२,२२४ कोटी रुपयांवर पोचला असून वार्षिक तत्त्वावर त्यात २३ टक्के वाढ झाली आहे.

कंपनीच्या ग्राहकांसाठी ताकदवान डिजीटल चॅनल म्हणून उदयाला आलेल्या PLANET अॅप या ग्राहकाभिमुख चॅनलने ३१ डिसेंबर २०२४ अखेर दीड कोटी डाऊनलोड संख्या ओलांडली असून त्यातील १३.८ लाख डाऊनलोड ग्रामीण भागातून आहेत. आजअखेर या चॅनलच्या माध्यमातून ३.१०० कोटी रुपयांचे संकलन झाले असून १०,५०० कोटींहून अधिक रुपयांचा पुरवठा (सोर्सिंग) झाला आहे.

या वित्तीय निकालांबाबत टिप्पणी करताना कंपनीचे मैनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री सुदीप्ता रॉय म्हणाले, "सूक्ष्मवित्त क्षेत्रात अनेक बृहद् आव्हाने असली तरी आम्ही परिस्थितीचे प्रभावी व्यवस्थापन केले आहे. पुढील काही तिमाहींमध्ये वातावरण अधिक उत्तम राहील याबाबत आम्ही आशावादी आहोत.

जागतिक दर्जाचे क्रेडिट अंडररायटिंग उभारण्यासाठी व पायाभूत सुविधांवर देखरेख करण्यासाठी आमची गुंतवणूक व प्रयत्न यापुढेही सुरू राहतील. प्रोजेक्ट सायक्लॉप्स या आमच्या प्रगत त्रिमित क्रेडिट अंडररायटिंग इंजिनचा १०० टक्के विस्तार दुचाकी वित्तपुरवठा वितरकांपर्यंत करण्यात आला असून कृषी उपकरणे वित्तपुरवठा व्यवसायातही ते कार्यरत झाले आहे.

कर्जपुरवठ्यातील अभिनवता कायम राखताना कंपनीने प्लॅटफॉर्मद्वारे अत्याधुनिक क्रेडिट सोल्यूशन्स विकसित करण्यासाठी आणि देण्यासाठी अॅमेझॉन पे सोबत धोरणात्मक सहयोग केला आहे. आम्ही वैयक्तिक कर्जांसाठी फोनपे समवेतही सहयोग विस्तारला असून ग्राहकांना अखंड डिजीटल कर्ज अनुभव मिळवून देत आहोत.

याखेरीज आम्ही नॉलेजेबल एआय (KAI) हा आर्टिफिशियल-इंटेलिजन्स आधारित चॅटबॉट सादर केला असून तो गृहकर्जांच्या अनुभवात क्रांती घडवून आणत आहे. आम्ही RAISE' 24 हा भारताचा बँकिंग, वित्तीय सेवा व विमा क्षेत्रांसाठीचा व आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या तत्काळ उपयोजनावर भर देणारा प्रमुख आर्टिफिशियल इंटेलिजन्स संकल्पनाधारित कार्यक्रम सादर केला आहे.

पुढील काळात आम्ही अभिनवतेला चालना देण्याप्रती तसेच ग्राहकांना अधिक उत्तम सेवा पुरवण्यासाठी समर्पित राहणार आहोत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.